मा. आयुक्त महोदया,
आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य नाशिक

विषय :- **राज्यस्तरीय आदिवासी ग्लोबल स्कॉलर्स प्रोग्रॅम राबविणेबाबत**
संदर्भ :-
शा.नि 21 जुन 2013
शा. नि. उद्योग व उर्जा विभाग 01.12.2016

एकलव्य इंडिया फाऊंडेशन संस्थेमार्फत प्रकल्प कार्यालय पांढरकवडा अंतर्गत नाविन्यपुर्ण योजनेतून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षापुर्व प्रशिक्षण देणे बाबतचा आदेश क्र. जा.क्र 578 दि. 29.01.2024

एकलव्य इंडिया फाऊंडेशन संस्थेमार्फत प्रकल्प कार्यालय किनवट अंतर्गत नाविन्यपुर्ण योजनेतून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र शासनाकडून विविध पदवी अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परिक्षांचे ( CUET) तयारी करुन घेणे बाबत आदेश क्र. जा.क्र 528 दि. 18.02.2025

दि. ११ नोव्हेंबर 2025 रोजी विडिओ कॉन्फरन्स द्वारे मा. आयुक्त, महोदया यांच्यासोबत झालेली चर्चा.

दि. २० नोव्हेंबर 2025 रोजी आयुक्तालय, नाशिक येथे आयुक्त महोदया यांचे दालनात ग्लोबल स्कॉलर प्रोग्रॅम बद्दल चे सादरीकरण.

आदरणीय महोदया,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, एकलव्य इंडिया फाऊंडेशन, यवतमाळ या संस्थेच्या माध्यमातून मागील तीन वर्षांत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा, किनवट आणि धारणी येथील आश्रमशाळेतील शिकणारे एकुण २३७ पहिल्या पिढीतील शिकणारे विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहचले आहेत, त्यामध्ये पुणे विद्यापीठ, IISER पुणे, अझीम प्रेमजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, या विद्यापीठांचा समावेश आहे. यासाठी आपल्या विभागाने केलेल्या सहकार्यासाठी धन्यवाद. तसेच सदर योजनेतून तीन प्रोजेक्ट आणि एकलव्य योजनेच्या माध्यमातून स्वबळावर राबवले आणि दोन साठी आम्हाला विभागामार्फत आर्थिक सहकार्य सुद्धा मिळाले त्याबद्दल खूप धन्यवाद

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मागच्या २० वर्षांपासून आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून ३० लेखन पासून ते ३ कोटी रुपयांपर्यंत परदेशी शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. परंतु आता पर्यंत फक्त ५७ विद्यार्थीच याचा लाभ घेऊ शकले आहेत. इतर विभागाच्या आणि समाजातील मुलांच्या तुलना करता आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत प्रमाण अत्यंत्य नगण्य आहे.



Scanned with OKEN Scanner

**EKLAVYA GRASSROOTS AND EDUCATION DEVELOPMENT FOUNDATION**
**(Eklavya India Foundation)**

एकलव्य

**REGISTRATION NO: U80902MH2021NPL367684**

सन २०१७ मध्ये स्थापन झालेली एकलव्य इंडिया फाउंडेशन ही एक स्वतःच्या अनुभवावर आधारित संस्था आहे, जी SC, ST, OBC, तसेच भटक्या आणि विमुक्त जमातींसह ऐतिहासिकदृष्ट्या वंचित समाजातील प्रथम-पिढीतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करते. एकलव्य उच्च शिक्षण, नेतृत्व संधी आणि सामाजिक-आर्थिक-भावनिक समर्थनाद्वारे करिअर संक्रमणांना मदत करते, ज्यामुळे गरिबीचे चक्र खंडित होते आणि समुदाय आदर्श निर्माण होतात. त्यांच्या एकात्मिक वर्षभराच्या कार्यक्रमात जागरूकता उपक्रम, एक-एक मार्गदर्शन, अनुभव, निवासी प्रशिक्षण, शिष्यवृत्ती आणि पालक सहभाग यांचा समावेश आहे, ज्यामुळे विद्यार्थी शैक्षणिक आणि व्यावसायिकरित्या प्रगती करू शकतात. पदवीधर परिवर्तनात्मक नेते म्हणून परत येतात, त्यांच्या समुदायांमध्ये व्यापक प्रभाव पाडतात, पद्धतशीर विषमतेवर लक्ष केंद्रित करतात आणि अधिक न्यायपूर्ण आणि समान समाजासाठी दुर्लक्षित आवाजांना बळ देतात.

सन २०१७ मध्ये स्थापन झालेल्या एकलव्य इंडिया फाउंडेशनने ८०० हून अधिक पोहोच कार्यशाळा आणि वर्षभराच्या कार्यक्रमांद्वारे पाव दशलक्षाहून अधिक प्रथम-पिढीतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून, वंचित समाजातील २५०० विद्यार्थ्यांचे जीवन बदलले आहे. मी युके सरकारच्या प्रतिष्ठित स्कॉलरशिप वर २०११ मध्ये लंडनमध्ये शिकायला गेल्यावर २०२२ पासून समाजातील वंचित शोषित विद्यर्थ्यांसाठी ग्लोबल स्कॉलर प्रोग्रॅम राबवित आहे, ज्यामध्ये आज जगभरातील आठ देशांत ७० स्कोलर्स परदेश शिक्षण घेत आहेत.

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि एकलव्य इंडिया फाउंडेशन यांच्यातर्फे Aadivasi Global Scholars Program (GSP) साठी अर्ज आमंत्रित. महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक मार्गदर्शन, तयारी आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा विशेष कार्यक्रम राबवला जात आहे. आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत ४० विदेशी शिष्यवृत्ती दिल्या जातात, ज्यामध्ये शुल्क, निवास, भोजन, प्रवास, व्हिसा आणि आरोग्य विमा यांचा समावेश आहे. कोर्स आणि विद्यापीठानुसार विद्यार्थ्यांना ₹३० लाख ते ₹३ कोटीपर्यंत स्कॉलरशिप शासनाद्वारे देण्यात येते.

- २-३ दिवसीय निवासी बूटकॅम्प: प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती आणि आवश्यक संसाधनांवर मार्गदर्शन (अनिवार्य; डिसेंबर २०२५ नियोजित).
- वन-ऑन-वन मेंटरशिप: जागतिक स्कॉलर्स व आपल्या पार्श्वभूमीच्या मेंटॉर्सकडून वैयक्तिक मार्गदर्शन.
- ॲप्लिकेशन सपोर्ट : SOP, CV, Proposal, LOR, Writing Samples, IELTS/TOEFL तयारी आणि मुलाखत मार्गदर्शन.
- सहभागी सहयोग : जागतिक स्कॉलर्स नेटवर्क, मानसिक आरोग्यासाठी सपोर्ट व नेतृत्व विकासाच्या संधी.

तरी वरिलप्रमाणे सदर योजनेस अपर आयुक्त निहाय 10.00 लक्ष ( अक्षरी -दहा लक्ष मात्र ) इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर निधी आपल्या विभागामार्फत उपलब्ध करुन द्यावा, ही नम्र विनंती. सोबत सविस्तर बजेट जोडले आहे.
धन्यवाद!

**Warm Regards,**

RajuKendre

DIRECTOR
EKLAVYA GRASSROOTS AND
EDUCATION DEVELOPMENT
FOUNDATION YAVATMAL
CIN NO. -U80902MH2021NPL367684



Scanned with OKEN Scanner